**पश्चिम** कर्नाटकच्या टेकड्यांवर 'अगुंबे' हे गाव वसलेले आहे. त्या गावाभोवतीच्या घनदाट जंगलामुळे व त्यात आढळणाऱ्या झाडं–प्राण्यांमुळेच (विशेषत: त्यातल्या सापांसाठी) ते प्रसिद्ध आहे. अलीकडेच मी अगुंबेला गेलो असताना मला एका आगळ्यावेगळ्या प्रकारचे मासेमारीच्या जाळ्यासारखे मशरूम (अळंबी) दिसले. वैज्ञानिक भाषेत ते dictyophora / phallus ह्या जातीचे आहे व त्याचे इंग्रजी नाव Stink-horn असे आहे. नावास अनुरूप असे हे मशरूम अतिशय दुर्गंधी पसरवतात. त्यामुळे बरेच कीटक त्यांच्याकडे आकर्षित होतात. हे कीटक त्या मशरूमला खात असताना त्याचे बीज कीटकांच्या अंगावर चिकटते आणि दुसऱ्या जागी जाऊन पडते. अचंबित करणारी बाब अशी आहे की, नर डास या मशरूमचे द्रव्य शोषून घेतात; परंतु त्यांचे बियाणे पसरवण्यास मदत करत नाहीत. ते मशरूम त्या डासांसाठी विषारी असावेत. Dictyophora / phallus च्या प्रजाती विविध रंगांत आढळतात. या अळंब्या जगभरात विषुववृत्ताच्या जवळपास वाढतात व इतर अळंब्यांसारखेच सडलेले लाकूड, प्राण्यांची विष्ठा व पालापाचोळ्यातून मिळणाऱ्या द्रव्यांवर जगतात. याच्या काही प्रजाती खाण्यायोग्य असतात. त्याचबरोबर काही चिनी औषधांमध्येही त्यांचा उपयोग होतो. काही आदिवासी ह्या अळंब्यांचा उपयोग खाण्यासाठी व धार्मिक विधींसाठी करतात.



**–ओम वक्नाली**

*om18@iiserb.ac.in*